# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# बारामती परिमंडळ, बारामती.

महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

CIN: U40109MH2005SGC153645
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

दाखल तारीख :–१४/११/२०१८
आदेश तारीख :–१६/०१/२०१९

## आदेश

केस क्र. २६/२०१८

| | |
|---|---|
| १) श्री. उध्दव दत्तात्रय इनामदार .,<br>ए. १४/१ विराट सोसायटी अभियंतानगर,<br>कामठवाडा, नाशिक ४२२००८ | तक्रार अर्जदार (ग्राहक) |

विरुध्द

| | |
|---|---|
| १) उप कार्यकारी अभियंता.,<br>म.रा.वि.वि.कं.मर्या,<br>वेळापूर उप विभागीय कार्यालय. | विरुध्द पक्षकार (महावितरण) |

कोरम:– १) श्री. बी. डी. गायकवाड, अध्यक्ष,
२) श्री. एस. के. जाधव, ग्राहक सदस्य,
३) श्री. एम. ए. लवटे, सदस्य सचिव,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६, मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## तक्रारीचे स्वरुप

१) तक्रारदार श्री. उध्दव दत्तात्रय इनामदार रा ए. १४/१ विराट सोसायटी अभियंतानगर, कामठवाडा, नाशिक ४२२००८ यांचे पिलीव ता. माळशिरस जि. सोलापूर येथील शेतीपंपाचे कनेक्शन रितसर अर्ज देवून दि. ११. ३.२००५ रोजी कायम स्वरुपी बंद केले परंतू नियमाप्रमाणे सुरक्षाठेव व व्याज दिले नाही. नियमाप्रमाणे व्याज व एस.ओ.पी. मिळावा तसेच वेळेत सुरक्षा ठेव व्याज दिले नाही याची रितसर चौकशी व्हावी व त्रासापोटी नुसकान भरपाई द्यावी अशी तक्रार दाखल केली आहे.

## गाऱ्हाण्याचे स्वरुप

## तक्रार अर्जदार (ग्राहक) यांचा तोंडी युक्तीवाद

तक्रारदार (ग्राहक) श्री. उध्दव दत्तात्रय इनामदार यांनी लेखी व तोंडी युक्तीवाद पुढील प्रमाणे केला. माझे ग्रा क्र. ३३९०८०६१३७३१ चे शेतीपंपाचे कनेक्शन कायम स्वरुपी बंद करावे म्हणून दिनांक १०.०३. २००५ रोजी मा. शाखा अभियंता महावितरण पिलीव यांचेकडे रितसर अर्ज दिला होता. त्यानुसार शाखा अभियंता महावितरण पिलीव यांनी सदर कनेक्शन दि. ११.०३.२००५ रोजी कायम स्वरुपी बंद केलेचे मा. सहाययक अभियंता माहावितरण वेळापूर यांना कळविले होते.

त्या प्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २०१० मधील १८.११ प्रमाणे व १८.१३ प्रमाणे ९० दिवसाच्या आत सुरक्षा ठेव व व्याज मिळणे अपेक्षीत होते. बारा वर्षे सुरक्षा ठेव व व्याज मिळाले नाही म्हणून १६.०५.२०१७ रोजी मा सहायक अभियंता वेळापूर यांचेकडे सुरक्षा ठेव व व्याज मिळावे म्हणून अर्ज दाखल केला त्यानुसार दि. २१.९.२०१७ रोजी सुरक्षा ठेव मिळाली परंतू व्याज मिळाले नाही.

दिनांक ११.३.२००५ ते २१.९.२०१७ या कालावधीतील सुरक्षाठेवीवरील व्याज मिळावे म्हणून मा. उपकार्यकारी अभियंता, वेळापूर यांना दि. १०.३.२०१८ रोजी अर्ज दिला परंतू माझे अर्जाचा विचार केला नाही म्हणून मा. कार्यकारी अभियंता अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष महावितरण सोलापूर यांचेकडे दि. २०.०८. २०१८ रोजी रितसर अर्ज दाखल केला. त्यावर दि. ११.९.२०१८ रोजी सुनावणी झाली. कक्षाकडून मिळालेल्या निकालावर नाराज होऊन योग्य न्यायासाठी आपणाकडे रितसर अर्ज दाखल केला आहे. मंचाकडे खालीलप्रमाणे मागणी करीत आहे.

१) दिनांक ११.३.२००५ ते दि. २१.०९.२०१७ या कालावधीतील सुरक्षाठेवीवरील व्याज मिळावे.

२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( standard of performance of distribution licensees for giving supply and determination for compensation regulation 2014) तरतुदी प्रमाणे.

अ) कायम स्वरुपी कनेक्शन बंद केलेचा दिनांक ११.३.२००५ पासून ते सुरक्षा ठेव जमा झालेचा दि. २१.९.२०१७ पर्यंत

ब) सुरक्षाठेव व्याज मिळणेचा अर्ज दिलेचा दिनांक १६.५.२०१७ पासून ते सुरक्षा ठेव जमा झालेचा दिनांक २१.९.२०१७ पर्यंत.

क) सुरक्षाठेव व्याज मागणी अर्ज दिलेचा दि. १३.३.२०१८ ते आज अखेरचा एसओपी मिळावा.

३) सुरक्षा ठेव व व्याज मिळणेस विलंब का झाला यांची चौकशी व्हावी संबधीत जबाबदार अधिकाऱ्यावर योग्य त्या कारवाईचा आदेश व्हावा.

४) विनाकारण त्रास देणे यापोटी ५०००/— रुपये भरपाई मिळावी.

५) योग्य तो न्यायाचा हुकूम व्हावा.

या व्यतिरिक्त आणखी काही सांगावयाचे आहे का असे विचारले असता नाही असे सांगण्यात आले.

## विरुध्द पक्षकार (महावितरण) यांचा तोंडी युक्तीवाद

श्री. एस.आर. राक्षे, उपकार्यकारी अभियंता, वेळापूर महावितरण यांनी लेखी व तोंडी युक्तीवाद पुढील प्रमाणे केला अर्जदाराचे अर्जाचे अवलोकन केले असता तक्रारदाराने दि. १४.९.२००३ ला कोटेशन भरलेले आहे पावती जोडलेली आहे. तक्रारदाराने १० मार्च २००५ ला उपकार्यकारी अभियंता वेळापूर यांचेकडून मिळालेल फायनल बील बॅकेत भरले आहे.

नंतर ग्राहकाने कॅम्पुटर लिखीत पत्राद्वारे दिनांक ३१.०३.२०१७ रोजी दिलेल्या अर्जामध्ये प्रथमत: विषयामध्ये सेक्युरीटी डिपॉझीट रु १८०० भरल्याचे व परत मिळणे बाबत उल्लेख केला आहे. व अर्जामध्ये व्याजासह रक्कम अकाऊंटमध्ये जमा करावी असा उल्लेख केला. सदरचा अर्ज उपविभागास दि. २१.९.२०१७ ला इनवर्ड झाला व तो अर्ज विभागीय कार्यालय अकलूजने डिपॉझीट रुपये १८००/— दि. २१.९.२०१७ ला अकाऊंटला जमा केले.

ग्राहकाने नंतर दि. १०.०३.२०१८ डिपॉझीट मिळाले आहे व दि. १६.०५.२०१८ ला डिपॉझीट व्याजासह मिळावे असा प्रथम उल्लेख केलेला आहे व त्या रक्मेवरील व्याज वीज जोड कायम स्वरुपी बंद केलेल्या तारखेपासून मिळाले नाही. असा अर्ज दिला. तो अर्ज उपविभगाने पत्र क्र. २१५६ दि. १२.०३.२०१८ ला विभागीय कार्यालयास पाठविला.

सदर सर्व अर्जावरुन ग्राहकाने प्रथमत: डिपॉझीट व व्याज मिळावे असा अर्ज दि. १६.५.२०१७ ला केलेला आहे. त्या अर्जानुसार ग्राहकास विभागीय कार्यालयाने व्याज ग्राहकाच्या अकाऊंटमध्ये दि. २१.९.२०१७ ला जमा केले आहे त्यामुळे ग्राहकाच्या अर्जानुसार दि. १५.०५.२०१७ च्या नुसार विभागीय कार्यालयाने वेळेत

काम केलेले आहे. व उपविभागाकडे आलेला व्याजासंबधी अर्ज उपविभागाने लगेच विभागीय कार्यालयाकडे पाठविला आहे.

## कारणमिमांसा

१) तक्रारदार ग्राहकाने दि. ११.०३.२००५ ते दि. २१.०९.२०१७ या कालावधीतील सुरक्षा ठेवीवरील व्याज मिळावे अशी मागणी केली महावितरणने आपल्या लेखी म्हणण्यामध्ये दि. २१.९.२०१७ ला ग्राहकाच्या अकाऊंटमध्ये व्याज जमा केले आहे असे म्हटले आहे. कागदपत्राचे अवलोकन केले असता तक्रारदारास दि. ११.३.२००५ ते दि. २९.९.२०१७ या कालावधीतील व्याज दिल्याचे दिसून येत नाही त्यामुळे महावितरणचे म्हणणे चुकीचे आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ मधील तरतुद १८.१३ The MSEDCL shall pay interest on the amount of security deposited in cash by the consumer, at rate equivalent to the bank rate of the reserve bank of India provided, the amount of security deposited by the consumer with the MSEDCL is equal to or more than Rs. Fifty and such interest shall be paid by the MSEDCL, by giving credit of said amount in the appropriate months bill, once in every financial year in the first quarter This is subject to change as may be decided by MERC from time to time.

या तरतुदी प्रमाणे तक्रारदार दि. ११.३.२००५ ते २१.९.२०१७ या कालावधीतील व्याज मिळणेस पात्र आहे.

२) तक्रारदार ग्राहकाने कायम स्वरुपी कनेक्शन बंद केलेचा दिनांक ११.३.२००५ पासून ते सुरक्षा ठेव जमा झालेचा दिनांक २१.९.२०१७ या कालावधीतील एसओपी मिळावा अशी मागणी केली आहे. तक्रारदार यांनी शेतीपंपाचे कनेक्शन कायम स्वरुपी बंद करावे याकामी दि. १०.३.२००५ रोजी रितसर अर्ज दिला होता.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी ) विनियम २००५ए मधील तरतुद १८.११ whenever the power supply of a consumer is disconnected permanently visa a vis agreement of power supply is terminated MSEDCL shall first adjust the amount of security deposit at the consumer to the MSEDCL towards the charge for the electricity supplied and

balance amount of security deposit at the consumer to the MSEDCL towards the charge for the electricity supplied. And balance amount of the of security deposit if any shall be refunded the consumer with in a period of ninety days from the date of termination of the agreement

या तरतुदी प्रमाणे सुरक्षा ठेव परत केली नाही म्हणून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (standard of performance of distribution licensees for giving supply and determination for compensation regulation 2014) मधील तरतुद Appendix A 8 other services ii) closure of account Time period for payment of final dues to consumer from the date of receipt of application for closure of account standard forty five days (Rural Areas) compensation Payable- Rs. 100 per week or part thereof delay प्रमाणे एस.ओ.पी. ची मागणी केली आहे महावितरणने आपल्या लेखी म्हणण्यामध्ये सुरक्षा ठेव व व्याज मागणी अर्ज कनेक्शन बंद करते वेळी केला नाही हे म्हणणे चुकीचे आहे तक्रारदार ग्राहकाने कनेक्शन कायम स्वरुपी बंद केलेच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आत सुरक्षाठेव व व्याज मिळावे अशी तक्रार मंचाकडे करणे आवश्यक होते मुदतीची बाधा येत असल्यामुळे एसओपी देता येत नाही.

३) अ) सुरक्षा ठेव व्याज मिळणेचा अर्ज दिलेचा दिनांक १६.५.२०१७ पासून ते सुरक्षा ठेव जमा झालेचा दिनांक २१.९.२०१७ या कालावधीतील तसेच

ब) सुरक्षा ठेव व्याज मागणी अर्ज दिलेचा दिनांक १३.२.२०१८ ते अमंलबजावणीच्या दिनांकापर्यंत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (standard of performance of distribution licensees for giving supply and determination for compensation regulation 2014) मधील तरतुद Appendix A 8 other services ii) closure of account Time period for payment of final dues to consumer from the date of receipt of application for closure of account standard forty five days (Rural Areas) compensation Payable- Rs. 100 per week or part thereof of delay

अ) सुरक्षा ठेव व्याज मिळणेचा अर्ज दि. १६.५.२०१७ पासून ते सुरक्षा ठेव जमाझालेचा दिनांक २१.९.२०१७ या कालावधीतील एसओपी मिळणेस तक्रारदार ग्राहक पात्र आहे.

ब) सुरक्षा ठेव व्याज मागणी अर्ज दिलेचा दि.१३.२०१८ ते अमंलबजावणीच्या दिनांकापर्यंत तक्रारदार ग्राहक एसओपी मिळणेस पात्र आहे.

४) सुरक्षाठेव व व्याज मिळणेस विलंब का झाला याची चौकशी व्हावी व संबधीत अधिकायावर कारवाई व्हावी अशी मागणी केली आहे. तक्रारदार ग्राहकाची मागणी योग्य आहे.

५) विनाकारण त्रास देणे यापोटी ५००० रुपयें नुसकान भरपाई मिळावी अशी मागणी तक्रारदार ग्राहकाने केली आहे अशी नुसकान भरपाई देण्याची मंचाकडे तरतुद नाही त्यामुळे ही मागणी मान्य करता येत नाही

मंच खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

# आदेश

१) तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) दिनांक ११.३.२००५ ते २१.९.२०१७ पर्यंतचे बॅंक दराने सुरक्षा ठेव व्याज देण्यात यावे

३) दिनांक १६.५.२०१७ ते २१.०९.२०१७ पर्यंत तसेच दि. १३.३.२०१८ ते अमंलबजावणीच्या दिनांकापर्यंत एस.ओ.पी देण्यात यावा.

४) या आदेशाची अंमल बजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या मंचास या आदेशाच्या दिनांकापासून दोन महिन्यात सादर करावा.

५ ) या निर्णया विरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

(श्री. बी. डी. गायकवाड)
अध्यक्ष

(श्री. एस. के. जाधव )
ग्राहक सदस्य,

(श्री. एम. ए. लवटे )
सदस्य सचिव